2015

# Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

(Bi-Monthly)
Peer-Reviewed Journal
Impact factor: 0.948

VOL – IV Issues: I

**Chief-Editor:**

**Ubale Amol Baban**

**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)**
**(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No IV Issues I**
**Jan 2015 ISSN 2278-5655**

# बदलते ग्रामीण जीवन व नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कथा

**कांबळे एम.एम.**
चांगू काना ठाकूर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
नवीन पनवेल.

प्रस्तावना :

कोणत्याही विशिष्ट काळातील साहित्याचे स्वरूप समजून घेतांना त्या काळातील सामाजिक स्वरूप व समाज वास्तवही समजून घ्यावे लागते. कारण माणूस हा समाजशील प्राणी असून समाजाशिवाय माणसाचा विचार होणे शक्य नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक लेखक हा कोणत्या ना कोणत्यातरी समाजाचा घटक असतो आणि साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. हा लेखक ज्या समाजात जन्मतो, वाढतो, ज्या समाजात त्याची सामाजिक, वैचारिक जडणघडण होते, त्याचे प्रतिबिंब त्याच्या आकलनानुसार त्याच्या साहित्यकृतित उमटत असते. तो ज्या समाजात राहतो त्या समाजातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक क्षेत्रात कालामानानुसार झालेले परिवर्तनही त्याला लिहिते करीत असते. एखादी साहित्यकृती जेव्हा तो लिहित असतो तेव्हा त्याचे साहित्यातून होणारे प्रकटीकरण हे केवळ त्याच्यापुरते मर्यादीत नसते तर तो एका समाजाचे प्रतिनिधीत्व करीत असतो. हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने मराठी ग्रामीण कथेचा विचार करीत असतांना बदलत्या सामाजिक स्थित्यंतरानुसार खेडे जसे बदलले त्यानुसार ग्रामीण कथासुद्धा बदलली व हे बदल ग्रामीण कथाकारांनी कशाप्रकारे चित्रित केले हे तपासणे आवश्यक ठरते.

1990 नंतर बदललेले ग्रामीण जीवनः—

भारत हा खेडयांचा देश असून भारतातील सत्तर टक्के लोकसंख्या ही खेडयात राहते. भारतातील या ग्रामीण जीवनाचा विचार केला असता शहरी जीवनाच्या तुलनेत हे ग्रामीण जीवन बरोबर संथ आणि स्थिर वाटत असले तरी त्यामध्ये बदल झालेला नाही असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही तर 1990 पर्यंत अगदी वर वर स्थिर वाटणारे परंतु हळूहळू बदलणारे खेडे 1990 नंतर अगदी झपाटयाने बदलले दिसते. कारण या कालावधीत राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पातळीवर जे स्थित्यंतरे आली त्याचा परिणाम फार मोठया प्रमाणावर भारतीय खेडयांवर सुद्धा झाल्याचे आपल्याला दिसून येते. त्याचप्रमाणे जागतिकिकरणाच्या माध्यमातून आलेल्या खाजगीकरण व उदारीकरणामध्ये जी जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेत. खेडयापाडयातून दळणवळणाची साधने वाढल्यामुळे अवैध वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला. खेडयातील लोकांचा शहरातील लोकांशी दररोज संबंध येऊ लागल्यामुळे त्यांची केशभूषा, वेशभूषा इत्यादी बाबतचे अनुकरण वाढले. ग्रामीण उद्योगधंदे नष्ट होवून शहरी संस्कृतिचे आक्रमण वाढले. वर्तमानपत्र, टीव्ही, दूरध्वनी, मोबाईल, यासारखी प्रसारमाध्यमे खेडयापाडयात येऊन पोहोचली. शेतीत यंत्राचा वापर वाढला.

खेडयातील लोक आता लोकसभा, विधानसभा व त्यांच्या गावापुरता ग्रामपंचायतीच्या निवडणूकीशीच संबंधीत न राहता सहकारी पतसंस्था, सहकारी बॅका, खरेदीविक्री संस्था, जिल्हा परिषद यासारख्या

निवडणूकीमध्ये सहभागी होऊ लागला. त्यामुळे सत्तेची लालसा वाढली. गटबाजी, सरंजामशाही प्रवृत्ती वाढली. भाऊबंदकीचे राजकारण वाढल्यामुळे कौटुंबिक जिव्हाळा नष्ट होवून आपुलकी व परस्पर सहकार्याची भावना नष्ट झाली.

या काळात खेडयातील सांस्कृतिक जीवनातही फार मोठा बदल घडून आला. करमणूकीची साधने बदलली. त्याच्या राहणीमानात बदल झाला. पैशाच्या बळावर आपण काहीही प्राप्त करू शकतो असा समज झाल्यामुळे पैसा म्हणजे प्रतिष्ठा हे समीकरण रूढ झाले. त्यामुळे कोणत्याही मार्गाने पैसा प्राप्त करणे हे जणू जीवनाचे ध्येयच बनले. त्यामुळे श्रीमंती आली पण माणूसकी नष्ट झाली. शेतमालाचे भाव घसरले त्यामुळे शेती व्यवसायाचे अवमूल्यन झाले. सुशिक्षितांची संख्या वाढली त्यामुळे नोकऱ्यांची संख्या घटली. सुशिक्षित असूनही शिक्षणाच्या व्यावसायिकरणामुळे नोकरी न मिळाल्याने तरूणातील व्यसनाधीनता वाढून तो गुन्हेगारीकडे वळू लागला. असे विविध प्रश्न निर्माण झाल्यामुळे खेडयातील वातावरण पूर्णपणे ढवळून निघाले.

नव्वदोत्तरी मराठी कथेत बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंबः—

वरील सर्व परिस्थितीच्या संदर्भात नव्वदोत्तरी ग्रामीण कथेचा विचार केला असता असे दिसून येते की, 1960 च्या आसपास जे ग्रामीण साहित्यिक लेखन करीत होते त्यातील रा. र. बोराडे व मनोहर तल्हार यासारख्या काही लेखकांचा अपवाद वगळता बाकी लेखकांचे लेखन या काळात थांबल्याचे दिसून येते. रा. र. बोराडे यांच्या कथा कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवनात जी परिवर्तने झाली. ज्या नवीन समस्या निर्माण झाल्या त्याचे चित्रण करतांना दिसून येतात. त्यांच्या ‘कणस’ या कथासंग्रहातील ‘पोतेरा’ या व इतर कथांमधून स्वार्थासाठी सहकार आणि राजकारण व तेथील सत्तांचा गैरवापर, शिक्षण घेऊनही बेरोजगारी वाटयाला आलेल्या तरूणांची अवस्था, शेतीचे बदललेले स्वरूप व उत्पन्नांची अनिश्चितता ग्रामीण माणसांव्दारा आपल्याच माणसाचे शोषण इत्यादी समस्यांचे अगदी वास्तवादी चित्रण करतांना दिसतात.

1990 नंतरच्या पहिल्या दशकातील जगदीश कदम यांची ‘लिव्हणं’ ही कथा किंवा भाष्कर चंदनशिव यांच्या ‘अंगारमाती’ या कथासंग्रहातील कथा गावात काम मिळत नाही म्हणून आपले घर, कुटुंब व गाव सोडून मुंबईसारख्या महानगरात कामाच्या निमित्ताने गेल्यावर तेथून परतल्यावर लक्षात येते की, आपण आपले घर, कुटुंब व गावच हरवून बसलेलो आहोत. याची झालेली जीवघेणी जाणीव अगदी परिणामकारकपणे मांडताना दिसून येते. तसेच याच काळातील बाबाराव मुसळे यांच्या ‘मोहरलेला चंद्र’ या कथासंग्रहातील ‘सरकारी हिशोब’ या कथेत जनतेचे रक्षक असलेले पोलीसच ग्रामीण माणसाच्या इज्जतीवर कशाप्रकारे आक्रमण करतात याचे चित्र रेखाटले आहे.

राजकारणी लोक ग्रामीण सामान्य गरीब व मजूर लोकांचा कशाप्रकारे कधी प्रेमाणे, कधी धाकदपट करून तर कधी त्याचे प्रश्न सोडविण्याचे आमिष दाखवून त्यांचा मोर्चे, मिरवणूका व सभा यासाठी वापर करून घेतात. मात्र यामध्ये त्यांचा कोणताही फायदा तर होत नाहीच उलट त्यांच्या वाटयाला दुःख व नैराश्यच येते. याचे वर्णन रवींद्र शोभणे यांच्या 1994 साली प्रसिद्ध झालेल्या ‘दाहीदिशा’ या कथासंग्रहातील ‘मोर्चा’ ही कथा करतांना दिसते. तर ललिता गादगे यांच्या ‘दुःख आणि अश्रू’ या कथा संग्रहातील ‘सोडवणूक’ ही कथा आपण

स्त्रिमुक्तीच्या चळवळीचा कितीही गाजावाजा करीत असलो तरी ही चळवळ अजूनही ग्रामीण कष्टकरी अशिक्षित स्त्रिपर्यंत पोहोचलेली नाही. ती आजही अबलाच असून तीला आजही नवरा, सासू सासरे, दीर नणंद यांचा छळ सहनच करावा लागतो आणि हे सगळे असह्य झाले की तिच्याजवळ आत्महत्येशिवाय पर्याय उरत नाही हे अगदी परिणामकारकपणे वर्णन करून जाते. तर 'अक्षदीचे दाने' आणि 'हजारी बेलपानं' प्रतिमा इंगोले यांच्या कथांमधून परंपरेत टिचून निघणारी समाज व नियती यांच्यामुळे दुःख भोगणारी व जीवनाच्या संघर्षात एकाकीपणे उभे असणारी स्त्री दिसून येते. याच काळातील बाबा भांड यांच्या 'कायापालट' या कथासंग्रहातील 'सावली' सारख्या कथेतून खेडयापाडयात अधश्रद्धा कशी कायम आहे व त्यामुळे स्त्रीच्या वाटयाला कोणते भोग येतात याचे वर्णन आहे.

मराठवाडयातील कथाकार म्हणून श्रीराम गुंदेकर यांना ओळखले जाते. गुंदेकर हे ग्रामीण भागातील असून शेती व्यवसायाशी असणारे त्याचे संबंध ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची पिळवणूक व शेतीतील त्याचे विविध जीवनानुभव त्यांनी 'लगाम' या कथेतून साकारली आहे. आजही ग्रामीण भागातील सावकार, गावातील कष्टकरी, गरीब व शेतकऱ्यांना कसे लुटतात, त्यांच्या मजबुरीचा कसा फायदा घेतात याचे वर्णन त्यांनी आपल्या 'उचल' हया कथासंग्रहातील कथांमधून केले आहे त्याचबरोबर शिक्षण संस्था हया आज खेडोपाडी वाडयावस्त्यांवर पोहोचल्या आहेत. त्यामधून शिक्षण देणारी शिक्षक मंडळी ही संस्था चालकांच्या जवळची व नात्यातील आहेत. परंतु त्याचवेळी ग्रामीण भागातील अनेक सुशिक्षित गरीब मुले शिक्षण घेवून नोकरीच्या शोधात वणवण भटकत आहेत. संस्था चालकांना देणगी देण्याची ऐपत नसल्यामुळे त्यांना नोकरी मिळू शकत नाही हे धगधगते वास्तव गुंदेकरांनी आपल्या कथांमधून चित्रित केले आहे.

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 'बारोमास' या कादंबरीचे लेखक सदानंद देशमुख यांचे 'लचांड' व 'उठावण' हे कथासंग्रह ग्रामीण जीवन प्रकट करणारे आहेत. स्वतःला आलेले अनुभव कलात्मक पातळीवर मांडून त्यांनी प्रभावीपणे शब्दांकित केले आहे. सर्वच पातळयांवर गाव कसा बदलला, ग्रामीण जीवनातील राजकारण, धर्मकारण आणि अर्थकारण यांच्यातील धुडगुस परिवर्तनामुळे निर्माण झालेले नवे प्रश्न, नव्या अडचणी, नव्या समस्या यांची व्यामिश्र, जटील आणि गुंतागुंतीचे स्वरूप तसेच ग्रामविकासाच्या नावाखाली पुढे आलेल नेतृत्व आपल्याच माणसांचे कसे शोषण करते. कुटुंबाच्या विभक्तीकरणाचे लोण खेडयापाडयापर्यंतही कसे पोचले आहे व त्यामुळे आपल्याच नात्यागोत्यातील माणसे आपल्याचा मााणसांचा कसे दुःस्वास करू लागले आहेत हे त्यांनी आपल्या कथांमधून अत्यंत प्रत्ययकारी रीतीने मांडले आहे.

उत्तम बावस्कर यांच्या 2000 साली प्रसिद्ध झालेल्या 'इस्कोट' या कथासंग्रहातून वरवर शांत दिसणारे ग्रामीण जीवन आतून कसे धुमसत आहेत याचा प्रत्यय येतो. ग्रामीण माणसाचे शोषण आणि भ्रष्टाचार आणि खेडयाच्या उद्धस्त वास्तवाचे विलक्षण आविष्कार त्यांच्या कथांमधून पाहायला मिळतात. खेडयाची नाळ तुटता तुटत नाही व तो शहरातही रूजू शकत नाही त्यामुळे अशा धुसमटीत सापडलेल्या माणसाची कथा बावस्कर मोठया ताकदीने उभी करतात.

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No IV Issues I
Jan 2015 ISSN 2278-5655

जयराज टकणे यांच्या आगडोंब 2001 हया कथासंग्रहातील कथांमध्ये वास्तवाला सरळ भिडण्याचे सामर्थ्य आहे. वर्तमानावर गंभीरपणे भाष्य करणारी त्यांची कथा वाचकाला अंतर्मूख करणारी आहे. तसेच नारायण शिंदे यांचा 'सपणसुगी', राम वाघमारे यांचा 'डोंटवरी सर' विजय चव्हाण यांच्या संवेदनशील मनाचा, शैलीदार व प्रांजळ भाषेचा आविष्कार असलेला रवण (2005) हा कथा संग्रह, खेडयातला माणूस, त्याच जगणं, त्याचे अनुभव, त्याच्या स्वभावातला बोलघेवडेपणा व वाचाळपणा चित्रित करणारा 'आडतास' आणि आसाराम लोमटे यांचा 'इडा पिडा टळो' हे सर्व कथासंग्रह आजच्या बदलत्या ग्रामीण जीवनाचे, वास्तवाचे आणि मानसिकतेचे प्रत्यय घडविणारे कथासंग्रह आहे.

निष्कर्षः—

1. नव्वदोत्तरी ग्रामीण कथेने बदलत्या ग्राम जीवनाचे चित्र रेखाटले आहे.
2. ही कथा ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण आविष्कार घडविणारी कथा आहे.
3. नव्वदोत्तरी ग्रामीण कथा ही कल्पनेपेक्षा अधिक वास्तवाभिमूख आहे.
4. नव्वदोत्तरी कथा ही स्वानुभवाशी व प्रकृतीशी प्रामाणिक राहून लिहिल्या जात आहे.
5. मानवी प्रवृत्तीत विविधतेच्या दर्शनासह पारंपारिक मुल्यविचारांना बसलेला तडाखा ही कथा चि़त्रित करते.

संदर्भग्रंथः—

1. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि विचार, डॉ. वासुदेव मुलाटे
2. ग्रामीण साहित्याची चळवळ व आम्ही, संपादक, डॉ. वासुदेव मुलाटे
3. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले.

Copyrights @ **कांबळे एम.एम.**.This is an open access peer reviewed article distributed under the creative common attribution license which permits unrestricted use, distribution and reproduction in any medium, provide the original work is cited.